## योजनेचे स्वरुप

चंद्रपुर शहरातील मा. जिल्हाधिकारी व शासनाकडुन प्राप्त निधीतुन बाबा आमटे अभ्यासिका कार्यरत झाली आहे. ही अभ्यासिका नोंदणीकृत संस्थेला भाडे तत्वावर चालविण्यास देण्यात येणार आहे. त्यासाठी चांगल्या नामवंत नोंदणीकृत संस्थेकडून अर्ज मागविण्यात येतील. यास्तव काही अटी व शर्तीवर सुपात्र अशा खाजगी संस्थेला जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तीन वर्षासाठी अभ्यासिका भाडेतत्वार कराराने देण्यात येईल. अर्जदार संस्थेने या करिता सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे विहित कालावधीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. पात्रतेचे सर्व निकष पूर्ण करणा-या संस्थेच्या निवडीचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

# अटी व शर्ती

१ अर्जदार संस्था महाराष्ट्र शासन नोंदणीकृत किंवा धर्मदाय आयुक्त, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अथवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.

२) अभ्यासिका १ वर्षाकरिता भाडे तत्वावर चालविण्यास देण्यात येईल.

३) अनामत रक्कम रु.१,००,०००/- भरल्यानंतर अभ्यासिकेचा ताबा दिला जाईल.

४) संबंधित संस्थेव्दारे अभ्यासिका कक्ष / अध्यायन कक्ष/ इमारतीचा उपयोग व्यवस्थित / निर्धारित अटी शर्तीला अनुसरुन तसेच ज्या कार्यासाठी इमारत देण्यात आली आहे. त्यासाठीच करावा लागेल त्या व्यतिरिक्त उपयोग केल्यास एक आठवडयाची नोटीस देवुन करार केव्हाही रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना राहतील .

५) चालविण्यास देण्यात आलेल्या बाबा आमटे अभ्यासिकेच्या अटी व शर्तीचा भंग केल्यास एक आठवडयाची नोटीस देवुन अभ्यासिका परत घेण्यात येईल. त्या करिता कोणत्याही प्रकारचे कारण देण्याची जिल्हाधिकारी यांना आवश्यकता राहणार नाही तसेच संस्थेला इमारत सोडणे बंधनकारक असेल.

६) इमारतीची डागडुजी , रंगरंगोटी दरवर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेबर महिन्यात करण्यात यावी. इमारतीच्या रंगाचे निर्धारण मा. जिल्हाधिकारी करतील. संस्थेला अभ्यासिकेच्या इमारतीच्या परिसरात कोणत्याही प्रकारची जाहिरात लावण्याचा अधिकार राहणार नाही. परंतु शासनाची किंवा स्पर्धा परिक्षा संबंधित जाहिरात परिसरात लावण्यास प्रतिबंध राहणार नाही.

७) अभ्यासिका अध्ययन कक्षाच्या इमारतीचे विस्तारिकरण दुरुस्ती नविन उपक्रम करण्याकरिता संस्थेला मा. जिल्हाधिकारी यांची मंजुरी घ्यावी लागेल.

८) अभ्यासिकेचे विद्युत देयक व पाण्याचे शुल्क , स्वच्छता व कॅम्प्युटर मेंटन्स शुल्क तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे व इतर सर्व कर हे निविदा मंजूर केलेल्या संस्थेतस भरावे लागतील.

९) अभ्यासिकेत वर्तमानपत्रे साप्ताहिके , मासिके, पाक्षिके, त्रैमासिके इत्यादीचा पुरवठा वाचकांना संस्था करेल.

१०) अभ्यासिकेत वाचनसाहित्य उच्च दर्जाचे असायला पाहिजे स्पर्धा परिक्षा सरळसेवा भरती,समाजप्रबोधनपर पुस्तके व कौशल्य विकासावर आधारित साहित्य अभ्यासिकेत ठेवण्यात यावी. अश्लील साहित्य कोणत्याही परिस्थितीत ठेवण्यात येवु नये .

११) इमारत अभ्यासिका व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन या व्यतिरिक्त कोणत्याही कामासाठी इतरांना देता येणार नाही.

१२) दैनदिन खर्च भागविण्याकरिता अभ्यासिकेतील स्पर्धा परिक्षार्थीकडुन घेण्यात येणारे शुल्क ठरविण्याचा अधिकार संस्थेला असेल .

१३) अभ्यासिकेतील वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिके निशुल्क वाचनाकरिता सर्वासाठी उपलबध असावे.

१४) इमारतीचे मालकी हक्क व ताबा संपूर्णपणे मा.जिल्हाधिकारी यांच्या जवळ राहतील. संबंधित संस्थाना फक्त इमारत वापरण्याचे अधिकार असेल कोणत्याही परिस्थित संस्था मालकी हक्क बजावणार नाही.

१५) सदरील संस्थेला अभ्यासिकेची इमारत जशी आहे तशी देण्यात येईल.

१६) अभ्यासिकेची इमारत व वाचनीय साहित्य इतर साहित्य ( फर्निचर, संगणक ) इत्यादी साहित्य संस्थेला तीन वर्षाकरिता करार करुन देण्यात येईल.

१७) मा. जिल्हाधिकारी हे अभ्यासिकेत फर्निचर कोणते असावे व फर्निचरमध्ये वाढ करण्याच्या संदर्भात निर्णय घेतील. संगणक व इतर अनुषंगिक दुरुस्ती संस्थेला करावी लागेल.

१८) या धोरणाच्या अनुषंगाने एखाद्या पंजीकृत संस्थेशी करारनामा करित असतांना कायदेशीर सल्ला घेवून मा. जिल्हाधिकारी अभ्यासिकेच्या हिताचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या अतिरिक्त अटी व शर्ती टाकतील .

१९) कोणताही वाद निर्माण झाल्यास पक्ष क्र.१ व २ आपसी चर्चेतुन मध्यम मार्ग काढतील व वाद संपुष्टात आणतील. मात्र अशा वादाकरिता पक्ष क्र.१ कोणत्याही कारणास्तव न्यायालयात दाद मागणार नाही किंवा दावा दाखल करणार नांही. अंतीम निर्णय मा. जिल्हाधिकारी यांचा राहील.

२०) मा. जिल्हाधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याला संस्थेच्या कामकाजाचे निरीक्षण व तपासणी करण्याचा अधिकार राहील.

२१) अभ्यासिका चालविण्यास घेणारी नोंदणीकृत संस्था अभ्यासिकेचा कारभार स्वच्छ ठेवेल व वाचकांच्या समस्या सोडविण्यासाठी जबाबदार राहील. या संदर्भात प्राप्त तक्रारीवर मा. जिल्हाधिकारी कार्यवाही करण्यास सक्षम राहतील. व अशी कार्यवाही संस्थेवर बंधनकारक राहील.

२२) अभ्यासिकेची वेळ ही सकाळी ८.०० ते सायंकाळी ८.०० अशी राहील.

२३) अभ्यासिकेत दैनंदिन कामकाजाकरीता कर्मचा-यांची नियुक्ती संबंधीत संस्था करेल.

२४) अभ्यासिकेच्या सुरक्षेची जबाबदारी ही पूर्णत: संस्थेची असेल.

२५) अभ्यासिकेतील कुठलेही साहित्य चोरीला गेल्यास त्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील व त्याची किंमत अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

## जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
## बाबा आमटे अभ्यासिका चालविणाकरिता अर्ज

प्रति,

मा. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय
चंद्रपूर.

**विषय –बाबा आमटे अभ्यासिका भाडे तत्वावर चालविण्या बाबत.**
**संदर्भ** – स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रकाशित सार्वजनिक सुचना दि..........................

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने आपल्या समक्ष रितसर अर्ज सादर करण्यात येतो की, आमच्या............................. ............................... संस्थेला क्रिडा संकुलन समोरील बाबा आमटे अभ्यासिका चालविण्यासाठी आपणाव्दारे निर्धारित सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात यावी, हि विनंती. आमच्या संस्थेची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे

1. संस्थेचे नाव व पत्ता- ..........................................................................................................
2. स्थापना वर्ष ..........................................................................................................
3. संस्था मान्यता प्राप्त/ नोंदणीकृत झाल्याचे वर्ष ....................................................................
   (सहाय्यक संचालक ग्रंथालय महाराष्ट्र शासन यांच्याकडील नोंदणी किंवा धर्मदाय आयुक्त कडील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत)
4. संस्थेचे तीन वर्षाचे अंकेक्षण अहवालाची प्रत सादर करावे. ..........................................................................
5. संस्थेस मागील वर्षात विशिष्ट कार्याबद्दल एखाद्या मान्यता प्राप्त संस्थेकडुन/ महाराष्ट्र शासन केंद्र शासन/ इतराकडुन पुरस्कार प्राप्तझाला असल्यास त्याची माहिती ...................................................................................
6. संस्थेमध्ये सद्या कार्यरत कार्मचा-यांची संख्या ....................................................................
7. संस्थेच्या इतर उपक्रमाबद्दलची माहिती ......................................................................
   ................ ...................................................................................................

तरी आम्ही आपणास नम्र विनंती करतो की, आमच्या संस्थेच्या उपरोक्त कार्याची प्रचिती लक्षात घेता आमच्या अर्जाचा सहानुभुतीपूर्वक विचार व्हावा .

पत्र व्यवहाराचा पत्ता-

.................................................................

आपला विश्वासू,

.................................................................

.................................................................

( अर्जदाराचे नाव)

## जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
## स्वारस्य अभिव्यक्ती प्रकटन (EOI)

शासनाकडुन प्राप्त निधीतुन बाधण्यात आलेली बाबा आमटे अभ्यासिका, मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम 1950 किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट 1860 नुसार नोंदणीकृत संस्थेला भाडे तत्वावर चालविण्याकरिता देण्यात येणार आहे. त्याकरिता अर्ज मार्गविण्यात येत आहेत. अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे तसेच www.chanda.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. अर्जदाराने आपले अर्ज आवश्यक माहितीसह व योग्य दस्तऐवजासह जिल्हाधिकारी कार्यालयात विहीत मुददतीत सादर करावे. अटी व शर्ती कार्यालयात कामकाजाच्या दिवशी सकाळी 10 ते 5.30 या वेळात पाहता येईल.

1) अर्ज विक्री दि. 04/09/2017 ते 19/09/2017 पर्यंत
2) अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख 24/09/2017
3) अर्जाची छाननी दि. 26/09/2017

**पात्रता-**

1) धर्मदाय आयुक्त यांच्याकडे, मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम 1950 किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट 1860 नुसार नोंदणीकृत असावे.
2) संस्थेने 3 वर्षाचे अंकेक्षणअहवाल सादर करावे.(सन 2014-15, 2015-16, 2016-17)
3) सन 2016-17 च्या वार्षीक लेखा नुसार संस्थेचे 50 लक्ष रुपयाचे भाग भांडवल असले पाहिजे.

जिल्हाधिकारी
चंद्रपूर

# कार्यालय चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

**क्रमांक :-** चंशमनपा/ग्रंथालय/ ८५८ /२०१७ **दिनांक :-** ४/०५/२०१७

प्रति,

मा.जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

विषय :- बाबा आमटे अभ्यासीकेचे हस्तांतरण करणेबाबत.

संदर्भ :- कार्यकारी अभियंता सार्व. बांधकाम विभाग क्रं.०१, चंद्रपूर यांचे कार्यालयीन पत्र क्रं. ७५९/तांत्रीक/२०१७,दिनांक १४/०२/२०१७ अन्वये.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग क्रं.१, चंद्रपूर यांचे मार्फत सिव्हील लाईन, चंद्रपूर येथे नव्याने तयार करण्यात आलेली ईमारत, बाबा आमटे अभ्यासीका, संदर्भीय पत्रकानुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. दिनांक १८ मार्च २०१७ ला सदर अभ्यासीका मनपामार्फत ताब्यात घेण्यात आली. सदर अभ्यासीका दिनांक २० मार्च २०१७ पासुन सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० व दुपारी ०४.०० ते रात्रो ०८.०० वाजेपावेतो सुरु आहे.

सदर अभ्यासीका केन्द्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच विविध स्पर्धात्मक परिक्षेची तयारी करणा-या विद्यार्थ्याकरीता तयार करण्यात आलेली असून, अश्या विद्यार्थ्याकरीता अंदाजे ६ हजार पुस्तकांची व्यवस्था मा.जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचेकडून अभ्यासीकेत करण्यात आलेली आहे. अभ्यासीकेत अभ्यास करण्याकरीता येणा-या विद्यार्थ्याकडून वेळेत बदल करण्याबाबत तसेच शासकीय व ईतर अवकाशाच्या दिवशीसुध्दा अभ्यासीका सुरु ठेवण्यात यावी याबाबत वारंवार मागणी करण्यात येत आहे.

अभ्यासीका चालविण्याकरीता मनपाकडे आवश्यक असलेला प्रशीक्षीत कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. तसेच मनपाच्या मंजुर आकृतीबंधामध्ये सुध्दा अभ्यासीकेबाबत अधिकारी/कर्मचारी वर्ग वर्गाकरीता तरतुद नाही. करीता सदर अभ्यासीका चालवितांना ब-याच अडचनी येत आहे. करीता अभ्यासीका चालवीण्याकरीता इतर कोणती संस्था इच्छुक असल्यास आपले मार्फत इच्छुक संस्थेला हस्तांतरीत केल्यास सोईचे होईल. सबब माहितीस सादर.

आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

C:\My File\Letter.M.2016.docx

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

क्रमांक : चशमनपा/ग्रंथालय/[illegible]/ २२२९/२०१७ दिनांक : ११ /०८/२०१७

प्रति,

मा.निवासी जिल्हाधिकारी साहेब,
जिल्हाधिकारी कार्यालय,
चंद्रपूर.

विषय :- ताबा पावतीची प्रत मिळण्याबाबत.

संदर्भ :-आपले दिनांक ११/०८/२०१७ चे दुरध्वनी आदेशान्वये -

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपण दिनांक ११/०८/२०१७ ला दुरध्वनीव्दारे बाबा आमटे अभ्यासीका हस्तांतरणाची ताबा पावतीची प्रत मागीतली असता, आपणास ताबा पावतीच्या ३ प्रती पुरविण्यात यत आहे.

उपायुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर

# TABA - PAWATI

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Name of work | :: | Construction of Baba Amte study centre at Civil Line, Chandrapur. |
| 2 | Administrative approval No. & Date | :: | Vide Collector, Chandrapur letter no. कार्या-१०/नविशा/अ.का./कावि-२०१५/१३०५ दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ |
| 3 | Administrative approval Amount | :: | 2,64,95,000/- |
| 4 | Allocation | :: | 8443/Deposit work/Collector 2015-16 |
| | **Plot Area** | | **2161.00 Sqm.** |
| 5 | Built up area | :: | 1) Ground floor built up area = 312.612 Sqm.<br>3365.00 Sqft.<br>2) First floor built up area = 312.612 Sqm.<br>3365.00 Sqft.<br>Total built up area = 625.224 Sqm.<br>6730.00 Sqft. |
| 6 | Details of building foundation | :: | R.C.C. Framed structure with column footing, Columns, Beams, Slab in M-20 Grade concrete |
| 7 | Walls & Plaster | :: | Fly ash brick masonary outer wall 230 mm and inner walls 115 mm thick in cement mortar 20/12 mm plaster on inside and sand faced plaster from out side 6 mm thick cement plaster for ceiling |
| 8 | flooring | :: | 1) Double charged vetrified tiles and granite<br>2) Vetrified tiles and ceramic tiles floor for toilet block |

| | | |
|---|---|---|
| 9 Dado and skirting | :: | Vetrified tiles 1.35 mt. height for hall and 2.4 mt. Height for toilet block |
| 10 Doors & Windows | :: | 1) Doors - Granite door frames and solid core shutter 35 mm thick |
| | :: | 2) Toilet door are of solid core door shutter with granite frame |
| | :: | Windows - Colour aniodised Alluminium extruded section three track sliding windows |
| | :: | 3) Alluminium louvered ventilator for toilet block |
| | :: | 4) Main entrance double leaf glass door and S.S. door four fould type. + Toilet doors glass doors - 2 Nos. |
| 11 Grill | :: | M.S. grill for windows and ventilators and S.S. doors Railing for staircase. |
| 12 Waterproofing | | Polymerised waterproofing on terrace |
| 13 Colouring & Painting | :: | 1) External paint proposed with exterior emulsion water based water proof cement paint and internal walls ceiling are painted with washable Acrylic emulsion paint. |
| 14 Water supply | :: | 150 mm dia tube well with G.I. pipe line from bore well to building |
| | :: | PVC water tank 2 Nos. of 2000 Ltr. Capacity provided on roof slab and 1 Nos. of 1000 Ltr. Capacity for drinking water |
| | :: | CPVC pipe is provided for distribution system |
| | :: | Sanitary fitting provided in the building |
| | :: | CPVC pipe line for internal and outer sanitary fittings. |

**Following fittings are provided**

| | | **Ground floor** | **First floor** |
|---|---|---|---|
| 15 Wash basin | :: | 4 No | 4 No |
| 16 European W.C. pan | :: | 2 No | 2 No |
| 17 Urinal | :: | 2 No | 2 No |

| | | |
|---|---|---|
| 18 Septic tank | :: | Septic tank with R.C.C slab |
| 19 Elevation | :: | Front elevation with structural steel work and A.C.P. work |
| | :: | Toughened glass in front elevation |
| 20 Compound wall | :: | Compound wall with R.C.C. column and beam in three sides of building with M.S. grill gate 2 No. |
| 21 Paver block | :: | Paver block is provided in front entrance portion and beside of cement road inside the premises |
| 22 Park and Gardens | :: | Rose plant, Lawn, Big trees, Small plants in front entrance portion, Right side and Left side |
| 23 Furniture work | :: | Executive chairs 5 Nos.<br>Computer tables 5 Nos. + work stations 2 No<br>Computer Chairs 40 Nos.<br>and Book racks 26 Nos.<br>For hall chairs with Tablet 150 Nos.<br>Table for Librarian 1 No. |
| 24 CCTV Cameras | | CCTV Cameras are provided in ground floor and first floor (Total 4 Cameras) |
| 25 Electrical fiting | :: | Tube light - 5 Nos.<br>Fans - 28 Nos.<br>Other lights - 28 Nos.<br>Street lights - 10+2 = 12 Nos.<br>Toilet light - 4 Nos.<br>Mirror lights - 2 Nos.<br>water pump - Tube well - 1 No.<br>Sump well - 1 No. |

| Handed over by | Taken over by |
|---|---|
| Executive Engineer<br>Public Works Division No.1,<br>Chandrapur | Depty Commissionar<br>Chandrapur Mahanagarpalika<br>Chandrapur |